# स्वातंत्र्याची पहाट !

## पोवाडा : २८ :

सोनियाचा दिवस आला। कष्ट आले ते फळाला ॥ चाल ॥ गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून॥ हाल झाले अती। परि नव्हती भीती। जनतेनं केला होता पण ॥ गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून॥ केली मोठी चळवळ। मनामधीं तळमळ। स्वराज्याची हो लागली तहान ॥ गेली० ॥ एक लागला छंद। जन झाले हो दंग। आतां झाला आनंद। घरोघरीं उभारा तोरण। गेली गुलामगिरी आलं स्वराज्य बघा धांवून ॥ चाल ॥ १८१८ सालाला। दुर्भागी हा भारत अपुला ॥ पारतंत्र्यकर्दमांत रुतला। गुलामगिरीचा फास गळ्याला। परवशेतचा जाच मनाला। गुलाम म्हणुनी हिणवित याला॥ चाल ॥ नवं राज्य पाहून लोक गांगरून गेला !॥ जो तो लागला नोकरी करायला। इंग्रजाचे गूण गायाला। इंग्रजाची टापटीप शिस्त जागोजागेला॥ पर पोटांतला कावा नाहीं कळला। आवळा देऊन कोहाळा काढला। गुलामगिरी चांगली असं वाटूं लागलं त्या वेळा। पण **लोकमान्य टिळकांनीं** मोह पार घालविला !॥ जी ॥ लोकसेवा लागले करायला। केसरीनं करून गर्जना देश हादरविला ॥ जी ॥ हें खपलं नाहीं साहेबाला। त्यानं टिळक धाडले तुरुंगाला। तीन वेळा तुरुंगवास झाला। पाठविलं काळेपाण्याला। तिथं गीतारहस्य लिहून। परत आले देशसेवेला॥ १९०८ च्या सालाला। क्रान्तिकारक पुढें जाहले कार्य करण्याला॥ चाफेकर गेले फांसाला। कैक वीर गेले फांसाला। दोन जन्मठेपेची शिक्षा सावरकरांला। असा मधें कांहीं काळ गेला। १९२० सालाला। लोकमान्य गेले स्वर्गाला। मग राष्ट्राची धुरा वाहण्याला। **महात्मा गांधी**



ते आले झुंज देण्याला ॥ जी ॥ सत्य-अहिंसा साथ देण्याला। त्यांनीं सरकारशीं असहकार केला। केली मोठी चळवळ देश थरारुन गेला॥ वकील, डॉक्टर, नोकर, प्रोफेसर, मास्तर, विद्यार्थी, शेतकरी, दुकानदार, चट सारा तय्यार झाला। तुरुंगांत डांबलं कैकाला ॥ १९३० सालाला। कायदेभंगाची चळवळ झाली नाहीं तोड त्याला ॥ दांडीयात्रा केली महात्म्यानं कायदा मोडायला ॥ जी ॥ तंवा हज्जारों गेले तुरुंगाला। **गांधीजींना** धाडलं तुरुंगाला। **जवाहरलाल** गेले तुरुंगाला। **सरदार पटेल** तुरुंगाला। **पंडित मदनमोहन** चालले तुरुंगाला। **सरोजिनी नायडू** तुरुंगाला। **खान अबदुल गफारखान** गेले शिक्षा भोगायला ॥ देश सारा थरारून गेला। **नेताजी सुभाषचंद्र** गेले तंवा तुरुंगाला ॥ १९४२ सालाला। **हिंदुस्थान छोडो**—असा मंत्र महात्म्यानं दिला। तंवा ९ ऑगस्टच्या दिवसाला। पुढाऱ्यांना पकडलं मुंबईला। क्रान्तीच्या ज्वाळा धडकल्या चारी बाजूला ॥ कैक वीर भूमिगत झाला। अन् करतो राष्ट्रसेवेला। जनतेनं लढा चालविला। कोण पुढारी होता तंवा बोला ?। सातारा-बिहार प्रान्तानीं झपाटा फार केला ॥ तिकडं सुभाषचंद्र निसटून गेले–अन् त्यांनीं जाऊन सिंगापुरला। आझाद हिंद फौजेची स्थापना करून। शत्रूशीं मुकाबला केला। पण जपान्यांचा पाडाव झाला। तंवा आझाद हिंद फौज लागली इंग्रजाच्या हाताला। मोठमोठे लष्करी अधिकारी तुरुंगाला। लाल किल्ल्यांत डांबलं सर्वाला। मग त्यांचा खटला चालला। **भुलाभाई देसाई** होते बचाव करण्याला। त्यांत असं ठरलं कीं स्वातंत्र्य मिळवायला जर कुणी लढा सुरू केला ! तर तो त्याचा गुन्हा नाहीं झाला ! ॥ सरकारानं सोडलं सर्वाला। तंवा साहेबाला वाटलं आतां हिंदुस्थान हातचा चालला। म्हणून त्यानं स्वराज्य देण्याचा कायदा एक केला। अन् १५ ऑगस्ट १९४७ ला। हिंदुस्थान स्वतंत्र झाला। आनंदी आनंद झाला। जनतेनें हाल सोसून।

स्वातंत्र्य आणलं दाराला । आतां पुढं करायचं काय बोला? ॥ चाल ॥ भांडणं पार विसरून । देशाचं करावं कल्याण ॥ एक जूट मोठी करून । देशाचं करावं कल्याण ॥ अज्ञान पार जाळून । ज्ञानाची गुडी उभारून ॥ राष्ट्राचा झेंडा रोवून । मानानं करावं वंदन ॥ चाल ॥ असं राष्ट्र बलवान करा । कीं अभिमान वाटेल सर्वाला ॥ असा सोन्याचा दिवस उगवला ॥ **पांडुरंग शाहीर** आला कवन गाण्याला ॥ जी ॥

रचना – १९-८-४७.